महाराष्ट्र शासन
अधीक्षक अभियंता, अकोला सिंचन मंडळ, अकोला
जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ,अकोला.
Email : seaic.akolawrd@maharashtra.gov.in
seaicakola@gmail.com
Fax : ०७२४-२४३५१४२ / Ph : ०७२४-२४३५३३०

## सेवानिवृत्त अधिकारी /अभियंता यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित करणे बाबत.

*****

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/ प्र.क्र. २७१५ /प्र.क्र.१००/१३/दि.१७ डिसेंबर, २०१६ अनुसार दिलेल्या निर्देशानुसार जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त सहायक अभियंता श्रेणी-२/ शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता यांची खालीलप्रमाणे कंत्राटी पद्धतीवर या मंडळांतर्गत अधिनस्त विभागीय कार्यालय **बुलडाणा** येथे विवक्षीत कामासाठी नेमणूक करावयाची आहे.

| अ. क्र. | संवर्ग | पदसंख्या |
|---|---|---|
| १) | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ३ |

जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त सहायक अभियंता श्रेणी-२/ शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता यांची नेमणूक कंत्राटी पद्धतीने (११) अकरा महिन्यांसाठी करावयाची आहे. सेवानिवृत्त सहायक अभियंता श्रेणी-२/ शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता यांना सिंचन व बांधकाम तसेच अनुषंगीक (विवक्षीत प्रकल्पाशी संबंधित सर्वेक्षण, अन्वेषण, संकल्पन व प्रकल्प अहवाल तयार करणे इ. प्रकारचे ज्ञान असणे आवश्यक आहे.तसेच त्यांना जलसंपदा विभागातील सहायक अभियंता श्रेणी-२/ शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता या पदावर केलेल्या सेवेचा पुरेसा अनुभव असणे आवश्यक आहे. ईच्छुक अर्जदारांनी विहीत नमुन्यातील अर्ज **अधीक्षक अभियंता, अकोला सिंचन मंडळ,अकोला,जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ,अकोला.** या कार्यालयाकडे दिनांक **२४/०८/२०२२ ते ०९/०९/२०२२** (सायंकाळी ५.०० वा.पर्यंत) प्राप्त होतील, अशा बेताने पोस्टाव्दारे किंवा प्रत्यक्ष सादर करावीत. अर्जाचे पाकिटावर "सेवानिवृत्त सहायक अभियंता श्रेणी-२/ शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता यांची कंत्राटी पध्दतीवर नेमणुक करण्याबाबत" असे स्पष्ट लिहण्यात यावे. नियोजीत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. सदर नेमणुका समितीद्वारे मुलाखती घेऊन करण्यात येतील. सदर नेमणूकांचे आदेश हे प्रादेशिक कार्यालयाच्या अंतीम मान्यतेनंतरच निर्गमीत करण्यात येतील.

## कंत्राटी पद्धतीने भरावयाच्या पदांचा व विवक्षीत कामांचा तपशिल.

| अ. क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचा तपशिल | जलसंपदा विभागातुन खालील पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी सदर पदांकरीता अर्ज करण्यास पात्र आहे. |
|---|---|---|---|
| (१) | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | क्षेत्रिय स्तरावरील सिंचन व्यवस्थापन/बांधकामाधीन प्रकल्पांचे बांधकाम/भुसंपादन व पुनर्वसन कामे ई. | सहायक अभियंता श्रेणी-२/ शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता / (स्थापत्य) |

## सदर नेमणुका हया खालील सर्वसाधारण अटी व शर्तींच्या अधीन राहतील.

१) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त सहायक अभियंता श्रेणी-२/ शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता यांना विवक्षीत कामांसाठी लागणारी विशेष अर्हता अथवा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त सहायक अभियंता श्रेणी-२/ शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता हे शारिरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक अधिकाऱ्याचे मुळ प्रमाणपत्र द्यावे लागेल.

३) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त सहायक अभियंता श्रेणी-२/ शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता यांस नेमूणक दिलेली कामे पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तिची राहील, त्याबाबतचे बंधपत्र / हमीपत्र तसेच अटी व शर्ती संबंधित उमेदवाराला मान्य आहेत याबाबतचे बंधपत्र उमेदवारास रु. १००/- च्या मुद्रांकावर (Bond Paper) देणे बंधनकारक राहील.

४) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त सहायक अभियंता श्रेणी-२/ शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता अधिकाऱ्याविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण नसावे. याबाबत अर्जदार हे ज्यां कार्यालयातुन सेवानिवृत्त झाले आहे आहेत, त्या संबंधित कार्यालयाकडुन तसे प्रमाणपत्र प्राप्त करुन सादर करणे बंधनकारक आहे.

५) करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितांस शासनाच्या कोणत्याही विभागात / संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावुन घेण्याबाबत वा नियमित सेवा किंवा इतर कोणताही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल, याबाबत अर्जदाराने रु. १००/- च्या मुद्रांकावर (Bond Paper) प्रतिज्ञालेख देण्यात यावा.

६) करार पद्धतीवर नियुक्ती करण्यात येणारे सेवानिवृत्त सहायक अभियंता श्रेणी-२/ शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता हे त्यांच्या वयाच्या ६५ च्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील. तथापि ज्या सेवानिवृत्त सहायक अभियंता श्रेणी-२/ शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता यांची सेवा त्यानंतर चालु ठेवणे आवश्यक आहे, असे मत असेल त्यांच्या सेवा सक्षम प्राधिका-यास

एकस्तर वरिष्ठ अधिका-यांच्या / प्राधिका-याच्या मान्यतेने पुढे चालु ठेवता येतील, मात्र कोणत्याही परिस्थितीत करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ७० व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील

७) सदर सेवानिवृत्त सहायक अभियंता श्रेणी-२/ शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता हे त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही कामात गुंतलेले नसावेत.अशा सेवानिवृत्त सहायक अभियंता श्रेणी-२/ शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता यांनी गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

८) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता लागु राहील.

९) अशा करार पध्दतीने नियुक्त होणाऱ्या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांनी त्यांना प्राप्त होणारे कागदपत्रे, माहिती, कामाबाबत व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.

१०) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त सहायक अभियंता श्रेणी-२/ शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता यांनी त्यांच्या सेवेच्या शेवटच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी संबंधित कार्यालयाकडून प्रमाणित करुन, तसे प्रमाणपत्र सादर करावे. तसेच प्रशस्तीपत्र / नैपुण्यपूर्वक काम केले असल्यास, तसेच प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यात यावे.

११) नियुक्त कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. करार पद्धतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमुन दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१२) क्षेत्रिय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही नैसर्गीक अपघात व काही आजार उद्भवल्यास कार्यालय / शासन बांधील राहणार नाही.

१३) अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त सहायक अभियंता श्रेणी-२/ शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता यांनी त्यांचे निवृत्तीवेतन मंजुरीचे महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक साक्षांकित दस्तऐवज सादर करणे आवश्यक आहे.

१४) सदर नेमणूका सर्वसाधारणपणे अकरा महिन्यांसाठीच राहतील. त्यापेक्षा जास्त कालावधी वाढविण्याची आवश्यकता भासल्यास संबंधितांचे कामकाज व आवश्यकता पाहून नियुक्ती अधिकारी तसा निर्णय घेऊ शकतील, कामाची निकड व स्वरुप लक्षात घेवुन केंव्हाही नेमणूक रद्द करण्यात येईल. तसेच वरील जागांपैकी काही जागांवर अल्प कालावधीसाठीच नेमणूक असेल. त्याबाबतचा निश्चित कालावधी नेमणूक आदेशात स्पष्ट केला जाईल.

१५) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराचे नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासुन १५ दिवसांचे आत रुजु होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्ठात येईल.

१६) मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांना पत्र ई-मेलव्दारे पाठविण्यात येईल व भ्रमणध्वनीवर लघु संदेशाव्दारे कळविण्यात येईल. यास्तव अर्जदारांनी आपल्या वैयक्तिक माहितीत त्यांचा ई-मेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी **अधीक्षक अभियंता, अकोला सिंचन मंडळ, अकोला,** जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, अकोला यांचे सुचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. अंतिम निवड झालेल्या अर्जदारांची यादी वरील कार्यालयाच्या सुचना फलकावर तसेच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. अंतीम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तिक ई-मेलवर कळविण्यात येईल.

१७) नियुक्त अर्जदाराला त्यांनी विहीत कार्यपालन केल्यामुळे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र. १००/१३/दिनांक १७ डिसेंबर, २०१६ मधील अटी व शर्तीप्रमाणे शासन निर्णयासोबत असलेल्या परिशिष्ट अ नुसार मासिक परिश्रमिक अनुज्ञेय राहील.

१८) नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील, त्याबाबतची कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

१९) सदर नियुक्ती क्षेत्रिय स्थळावर संबंधित विवक्षीत कामासाठी करण्यात येत असुन त्यासाठी योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास काही किंवा सर्व पदे रिक्त ठेवण्याचा अधिकार समितीस राहील.

२०) उमेदवाराने सदर नेमणूकीकरीता कोणत्याही राजकीय किंवा इतर बाह्य शक्तीच्या मार्गाने दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधिताचा अर्ज तात्काळ रद्द करण्यात येईल.

२१) करार पद्धतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या सेवानिवृत्त सहायक अभियंता श्रेणी-२/ शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता यांना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाहीत.

२२) उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरिक्त शासन / नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी ठरवतील त्या अटी व शर्ती अंतिम व बंधनकारक राहील.

**स्थळप्रत अ.अ.यांचेकडून मंजूर**

(शिल्पा आळशी)

**सहा.अधीक्षक अभियंता,**

**अकोला सिंचन मंडळ,अकोला**

# विहीत नमुन्यातील अर्ज

## सेवा करार पद्धतीने विवक्षीत कामांसाठी सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांची नेमणूक करण्यासाठीचा अर्ज.

प्रति,

अधीक्षक अभियंता
अकोला सिंचन मंडळ
अकोला

उमेदवाराने अलिकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे.

अर्ज केलेल्या पदाचे नाव :-

१) अर्जदाराचे नांव :-

२) कायमचा पत्ता :-

३) दुरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनीसह (अनिवार्य) :-

४) ई-मेल (अनिवार्य) :-

५) सध्याचा पत्ता :-

६) जन्मतारीख :-

७) राष्ट्रीयत्व :-

८) प्रवर्ग :-

९) लिंग (पुरुष / स्त्री) :-

१०) अवगत भाषा :-

**११) शैक्षणिक माहिती :-**

**१२) शैक्षणिक माहिती :-**

| अ.क्र. | परिक्षा | वर्ष | विषय | शाळा/कॉलेजचे नाव | बोर्ड/विद्यापिठ | मिळालेल्या गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |

१३) **इतर शैक्षणिक माहिती (संगण्क इत्यादी)**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | वर्ष | संस्थेचे (प्रायोजक नांव) | मिळालेल्या गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

१४) **अनुभव** :-

| अ.क्र. | हुद्दा व वेतन | कार्यालयाचे नांव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

१५) सेवा निवृत्तीचा दिनांक :-

१६) सद्य:स्थितीत कुठे काम करीत असल्यास तपशिल :-

१७) प्रमाणपत्र :-

मला पुर्णपणे माहिती आहे की, पायाभुत सुविधा निर्मीती एमपॅनलमेंट व्दारे प्रकल्पाचे क्षेत्रिय कामाकरीता सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी कनिष्ठ अभियंता या पदाकरीता उमेदवारांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पद जाहिरातीत नमूद विवक्षीत कामासाठीच असुन जास्तीत जास्त अकरा महिन्यांच्या कालावधीसाठीच आहे. कामाच्या निकडीनुसार बुलडाणा येथे माझी काम करण्याची तयारी आहे.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझे माहिती प्रमाणे वर दिलेला तपशिल सत्य व अचुक आहे. यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पुर्व सुचना शिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेल, याची मला पुर्ण जाणीव आहे.

ठिकाण :- अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

दिनांक :-